ePaper अन्यथा या निवडणुकीनंतर तुम्ही जेलमध्ये गेल्याशिवाय राहणार नाही:प्रकाश आंबेडकर

| वर्ष - 7 । अंक - 292 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- रोहित शर्माची धुवांधार बॅटींग!
- तुम नज़रें ठीक करो!
- सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड!
- राज्याचे चौथे महिला धोरण जाहीर!


www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 9 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शिरूर लोकसभा मतदार संघात मोठा 'ट्विस्ट'

# आढळरावांची निवडणुकीतून माघार?

### आढळराव पाटील म्हणतात... मी अद्याप तिकीटासाठी आग्रही नाही

। पुणे । महाईन्यूज

**शिरूर लोकसभा निवडणुकीत मला तिकिट द्यावे, अशी मागणी मी अद्याप केली नाही किंवा त्याबाबत जाहीर वक्तव्य केले नाही. राज्याचे मुख्यमंत्री आणि आमचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे ठरवतील तो निर्णय मला मान्य असेल. शिरूरच्या निवडणुकीसाठी मला तिकिट मिळावे यासाठी मी आग्रही नाही, अशा शब्दांत शिरूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छुक असलेल्या शिवाजीराव आढळराव पाटील यांनी भूमिका स्पष्ट केली.**





दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून ऑफर आल्यास त्याबाबतही पक्षप्रमुख ठरवतील तेच मान्य करू असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणातून एक पाऊल मागे घेतल्याची चर्चा सुरू झाली आहे.

म्हाडाच्या पत्रकार परिषदेत राजकीय परिस्थितीबाबत विचारता त्यांनी वरील भूमिका स्पष्ट केली. 'प्रसारमाध्यमांमधूनच 'मी आज शिवसेनेकडे', 'उद्या राष्ट्रवादीकडे जाणार' अशा बातम्या येत होत्या. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होत होता. त्याबाबत कार्यकर्त्यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवायचीच असे स्पष्ट केले. जोपर्यंत कोणत्या पक्षाकडे जागा हे निश्चित होत नाही तोपर्यंत पर्याय खुला राहील, असे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. परिस्थितीनुसार, निवडणूक लढवू. त्याबाबत माझे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठरवतील ते मला मान्य असेल. निवडणूक लढविण्यासाठी मी आग्रही नाही,'असा पुनरुच्चार करत शिवाजीराव आढळराव पाटील यांनी भूमिका मांडली.

दोन दिवसांपूर्वी मंचर येथील कार्यक्रमादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आढळराव पाटील यांच्या संस्थेला भेट दिली. यावेळी आढळराव पाटील राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. तर दुसरीकडे, आढळराव यांच्या उमेदवारीवरून राष्ट्रवादीच्या आमदारांचा विरोध सुरू झाला.

याबाबत विचारता, आढळराव यांनी 'महायुतीचा निर्णय मला मान्य असेल. राष्ट्रवादीकडून लढविण्यास सांगितल्यास निवडणूक लढवू. राष्ट्रवादीच्या आमदारांचा आणि कार्यकर्त्यांचा विरोध का आहे हे अनाकलनीय आहे. विरोध असताना मी राष्ट्रवादीकडे उमेदवारीसाठी जाणार नाही,' अशा शब्दांत उमेदवारीबाबतही त्यांनी भाष्य केले.

### मनोमिलन आहे म्हणूनच महायुती...



» महाविकास आघाडीचे सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेनेला संपवत असल्याचा गंभीर आरोप आढळराव पाटील यांनी केला होता. याबाबत पुन्हा राष्ट्रवादी सोबत जाणार का, या प्रश्नावर त्यांनी 'आताची परिस्थिती बदलली आहे', असे अढळराव पाटील यांनी स्पष्ट केले. महायुतीमध्ये कार्यकर्त्यांचे मनोमिलन झाले का या प्रश्नावर, 'मनोमिलन आहे, म्हणूनच महायुती एकत्रित लढते आहे', अशा शब्दांत राष्ट्रवादीशी सलगी करण्यामागचे कारणही माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांगितले.

---

## सत्तेचा 'अहंकार' आता लोकच जिरवतील!

### मावळात राजकीय वातावरण तापले : रोहीत पवारांनी सुनील शेळकेंना सुनावले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार सुनील शेळके ज्या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करतात ती एक स्वाभिमानी भूमी मानले जाते. त्या भूमीमध्ये लोकप्रतिनिधित्व करत असताना तुमच्यात इतका अहंकार येतो की तुम्ही देशाच्या एका मोठ्या आणि अनुभवी नेत्यावर खालच्या भाषेत बोलता, लोकं हे सहन करणार नाही, असं म्हणत रोहित पवारांनी शेळकेंना फैलावर घेतलं आहे. राज्याचं राजकारण सद्या राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या एका नेत्यावर प्रचंड तापलेले आहे. स्वत: संयमी आणि शांत राहणारे शरद पवार यांनी आमदार सुनील शेळकेंना थेट इशारा दिल्यानंतर आता रोहित पवारांनी पण बोचरी टीका केली आहे.**



आमदार रोहित पवार म्हणाले, शरद पवार हे फक्त सुनील शेळकेबाबत बोले असं नाही. तर त्या वृत्तीबाबत बोलले आहे. पुणे बारामती, मावळ, आंबेगाव अशा या भागात जे लोक साहेबांच्या बाजूने आहेत. पुरोगामी विचारांच्या बाजूने आहेत. त्यांना दमदाटी करून धमकावलं जातं. त्यांना नोकरीवरून काढलं जातं. ही जी वृत्ती आहे ती योग्य नाही. म्हणून शरद पवार यांनी त्या वृत्ती आणि अहंकारी नेत्यांना धमकी दिली असं बोलायला हरकत नाही, असं रोहित पवार म्हणाले. ही अहंकारी वृत्ती सुनील शेळकेंकडे कुठून आली असं तुम्हाला वाटत? रोहित पवार म्हणाले, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री मंत्रालयात गुंडांना प्रवेश देऊन त्यांच्यासोबत फोटो काढत ते सोशल मीडियावर व्हायरल करत आहे. या गोष्टींवरून लोकांमध्ये एक संदेश जातो की सरकारचा गुंडांना वरदहस्त आहे. हे पाहून काही नेत्यांना अहंकार येत असावा, असेही रोहीत पवार यांनी म्हटले आहे.

> "आपल्या आता कोण विरोधात नाही म्हणून आपला कोणीच आता विरोधक नाही अशी भावना जेव्हा लोकप्रतिनिधीमध्ये येते तेव्हा त्याचा अहंकार वाढतो. तोच अहंकार आमदार सुनील शेळके यांच्या बोलण्यामधून दिसून आला. याला जनताच उत्तर देईल.
>
> **-रोहीत पवार,** आमदार.

# मतदान यंत्रे ठेवलेल्या गोदामात आग!

## » सतर्क यंत्रणेत बिघाड, आयोगाच्या परवानगीने दुरुस्ती

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सासवड येथील प्रारूप मतदान यंत्रे चोरीला गेल्याच्या प्रकारानंतर मतदान यंत्रे ठेवण्यात आलेल्या कोरेगाव पार्क येथील भारतीय खाद्य गोदामाच्या (फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया – एफसीआय) आग सतर्क यंत्रणेत (फायर अलार्म) तांत्रिक बिघाड झाला. भारत निवडणूक आयोगाच्या परवानगीने आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत हा बिघाड दुरुस्त करण्यात आला. गोदामातील सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत असल्याचे जिल्हा निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.**

भारतीय खाद्य गोदामात लोकसभा निवडणुकीसाठी वापरण्यासाठी प्रथमस्तरीय तपासणी झालेली मतदान यंत्रे ठेवण्यात आली आहेत. गुरुवारी रात्री सातच्या सुमारास या गोदामातील आग सतर्क यंत्रणेत बिघाड होऊन भोंगा अचानक वाजण्यास सुरुवात झाली. सुरक्षारक्षकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली. अग्निशामक सिलिंडर या ठिकाणी होते, तरीदेखील खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशामक बंब मागविण्यात आला. गोदामाचे सीसीटीव्ही चित्रीकरणही तपासण्यात आले.

तपासणीनंतर तंत्रज्ञांनी आग सतर्क यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. या प्रकाराची माहिती तत्काळ निवडणूक आयोगाला पाठविण्यात आली आणि बिघाड दुरुस्त करण्याची परवानगी घेण्यात आली.निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष गोदाम उघडण्यात आले. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. गोदामातील सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत असल्याची खात्री करून बिघाड दुरुस्त करण्यात आला. राजकीय पक्ष प्रतिनिधींनादेखील याबाबत माहिती देण्यात आली.



> “ गोदामात अग्निशामक यंत्रणा आहे आणि कडक सुरक्षा व्यवस्थादेखील आहे. तांत्रिक बिघाडामुळे झालेल्या या प्रकाराची माहिती प्रशासनाने निवडणूक आयोगाला दिली असून, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमक्ष आवश्यक दुरुस्ती करण्यात आली आहे. सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत आहेत. मतदान यंत्रांच्या सुरक्षेबाबत प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.
>
> **– डॉ. सुहास दिवसे,** जिल्हाधिकारी

संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरणदेखील करण्यात आले. याबाबतचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठविण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशामक अधिकाऱ्यांकडून तांत्रिक बाबी संदर्भात अहवाल मागविण्यात आला आहे. तो प्राप्त होताच या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये या दृष्टीने आवश्यक खबरदारीच्या अतिरिक्त उपाययोजना करण्यात येतील, असे जिल्हा निवडणूक शाखेने स्पष्ट केले.. तपासणीनंतर तंत्रज्ञांनी आग सतर्क यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. या प्रकाराची माहिती तत्काळ निवडणूक आयोगाला पाठविण्यात आली आणि बिघाड दुरुस्त करण्याची परवानगी घेण्यात आली.निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष गोदाम उघडण्यात आले.

### सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत

» भारतीय खाद्य गोदामात लोकसभा निवडणुकीसाठी वापरण्यासाठी प्रथमस्तरीय तपासणी झालेली मतदान यंत्रे ठेवण्यात आली आहेत. गुरुवारी रात्री सातच्या सुमारास या गोदामातील आग सतर्क यंत्रणेत बिघाड होऊन भोंगा अचानक वाजण्यास सुरुवात झाली. सुरक्षारक्षकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली. अग्निशामक सिलिंडर या ठिकाणी होते, तरीदेखील खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशामक बंब मागविण्यात आला. गोदामाचे सीसीटीव्ही चित्रीकरणही तपासण्यात आले. तपासणीनंतर तंत्रज्ञांनी आग सतर्क यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. या प्रकाराची माहिती तत्काळ निवडणूक आयोगाला पाठविण्यात आली आणि बिघाड दुरुस्त करण्याची परवानगी घेण्यात आली.निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष गोदाम उघडण्यात आले. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.गोदामातील सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत असल्याची खात्री करून बिघाड दुरुस्त करण्यात आला. राजकीय पक्ष प्रतिनिधींनादेखील याबाबत माहिती देण्यात आली.

# कॅब कंपन्यांवर परिवहन विभागाचा कारवाईचा दंडुका!

## » प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**उपयोजन व संकेतस्थळाद्वारे प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याचे समोर आले आहे. अशा १८ कंपन्यांवर कारवाई करून त्यांचे उपयोजन व संकेतस्थळे बंद करण्याची भूमिका परिवहन विभागाने घेतली आहे. याबाबत परिवहन विभागाकडून पोलिसांच्या सायबर सेलच्या विशेष महानिरीक्षकांना कळविण्यात येणार आहे.**



याप्रकरणी पुण्याचे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांना पत्र पाठविले आहे. त्यात त्यांनी उपयोजन व संकेतस्थळाद्वारे प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ९३ (१) नुसार या कंपन्यांनी व्यवसाय करण्याआधी परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांचे उपयोजन आणि संकेतस्थळे बंद करण्याबाबत सायबर सेलच्या विशेष महानिरीक्षकांना कळवावे, असेही पत्रात नमूद केले आहे.

एमएमटी, गोआयबीबो, रेडबस, गोझो कॅब, सवारी, इन ड्राइव्ह, रॅपिडो, कार बझार, टॅक्सी बझार, ब्ला ब्ला कार, कॅब-ई, वन वे कॅब, क्वीक राइड, एस राइड, गड्डी बुकिंग बाय कुलदेव, टॅक्सी वॉर्स, रूट मॅटिक आणि ओनर टॅक्सी या १८ कंपन्यांकडून बेकायदारीत्या व्यवसाय सुरू आहे. “ओला आणि उबरकडूनही विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याप्रकरणी परिवहन विभागाला आधी पत्र पाठविण्यात आले होते. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत त्यांच्याबाबत अंतिम निर्णय होणार आहे. त्यामुळे उपयोजन व संकेतस्थळे बंद करण्यासाठी पाठविलेल्या कंपन्यांच्या यादीत ओला, उबरचा समावेश नाही”, असे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी म्हटले आहे.वातानुकूलित टॅक्सीच्या दरात ओला आणि उबर कंपनीने भाडेवाढ केलेली नाही. यामुळे कॅबचालकांकडून बेमुदत बंद सुरू होता. हा बंद ११ मार्चपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### कॅबचालकांचा बंद अखेर मागे

» प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ११ मार्चला होत असून, या कंपन्यांवर कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे. प्रशासनाकडून कारवाई न झाल्यास पुन्हा आंदोलन केले जाईल, असे भारतीय गिग कामगार मंचाचे डॉ. केशव क्षीरसागर यांनी सांगितले.उपयोजन व संकेतस्थळाद्वारे प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याचे समोर आले आहे. अशा १८ कंपन्यांवर कारवाई करून त्यांचे उपयोजन व संकेतस्थळे बंद करण्याची भूमिका परिवहन विभागाने घेतली आहे. याबाबत परिवहन विभागाकडून पोलिसांच्या सायबर सेलच्या विशेष महानिरीक्षकांना कळविण्यात येणार आहे.

# पुणे-पिंपरी-चिंचवडकरांसाठी खुशखबर

# चावी वाटपला आयुक्तांचा 'ग्रीन सिग्नल'!

## तब्बल 4 हजार 777 घरांची निर्मिती : इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्वसामान्य नागरिकांसाठी एक मोठी खुशखबर काल म्हाडाने दिली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) या घरांची सोडती जाहीर केल्या आहेत. म्हाडा कार्यालयात सोडतीचा प्रारंभ म्हाडा पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला आहे. यावेळी म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील या वेळी उपस्थित होते.**




पुणे मंडळाककडून विविध उत्पन्न गटातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांमधील तब्बल ४७७७ घरांसाठी सोडत जाहीर करण्यात आली.

त्यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील अनुक्रमे ७४५ आणि ५६१ घरांचा समावेश आहे. या सोडतीसाठी शुक्रवारपासून (८ मार्च) अर्ज भरता येणार आहेत. गुरुवारपासून (७ मार्च) नोंदणीला सुरुवात करण्यात आली, तर अर्ज शुक्रवारी दुपारी तीन वाजल्यापासून भरता येणार आहेत.

ऑनलाइन अर्ज नोंदणीची मुदत ८ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत, तर सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याची मुदत १० एप्रिल रोजी रात्री ११.५९ पर्यंत असणार आहे.

अर्जाचे ऑनलाइन शुल्क भरण्याची मुदत १२ एप्रिलपर्यंत आहे. जानेवारी २०२१ पासून सप्टेंबर २०२३ पर्यंत एकूण ३१ हजार ५९७ सदनिकांसाठी सात ऑनलाइन सोडत काढण्यात आल्या आहेत, त्यासाठी एकूण चार लाख आठ हजार इतके अर्ज आले आहेत, असे सभापती आढळराव यांनी सांगितले.

### अर्जदारांनी या संकेतस्थळावर भरा अर्ज...

» दरम्यान, म्हाडाच्या घरांच्या सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी अर्जदारांनी प्रथम WWW.MHADA.GOV.IN किंवा HTTPS://MHADA.GOV.IN या संकेतस्थळास भेट द्यावी, तर 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावरील योजनांच्या सदनिकांसाठी LOTTERY.MHADA.GOV.IN या संकतेस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन म्हाडा पुणेचे मुख्य अधिकारी पाटील यांनी केले.

### सोडतीचा तपशील योजना आणि सदनिका याप्रमाणे...

- म्हाडा योजनेंतर्गत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य - २४१६
- म्हाडाच्या विविध योजना - १८
- म्हाडा पंतप्रधान आवास (पीएमएवाय) योजना - ५९
- पंतप्रधान आवास (पीएमएवाय) खासगी भागीदारी योजना (पीपीपी) - ९७८
- २० टक्के योजना पुणे महापालिका ७४५, पिंपरी-चिंचवड ५६१
- एकूण ४७७७ सदनिका

---

# पिंपळे सौदागरमध्ये संजोग वाघेरेंची अनोखी 'शिवभक्ती'

## भाविकांच्या मदतीसाठी स्वयंसेवक : परिसरातील नागरिकांकडून उपक्रमाचे कौतूक

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये महाशिवरात्रीनिमित्त भक्तीमय वातावरण पहायला मिळाले. शहरातील सर्वच शिव मंदिरांमध्ये भक्तांनी गर्दी केली होती. विविध धार्मिक कार्यक्रम, सोहळा आणि अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल असल्यामुळे मंगलमय वातावरणात महाशिवरात्री उत्सव साजारा करण्यात आला.**








शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा मतदार संघाचे संघटक आणि माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी शहरात ठिकठिकाणी शिवमंदिरात भेटी दिल्या आणि श्रींचे दर्शन घेतले. पिंपळे सौदागर येथे प्रतिवर्षाप्रमाणे महाशिवरात्री महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. त्यानिमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होत

पवना नदीच्या काठावर वसलेले शिवकालीन शिवमंदिर म्हणून पंचक्रोशीमध्ये या मंदिराची ओळख आहे. पिढ्यान् पिढ्या उभे असलेल्या या शिवमंदिराच्या दर्शनाकरीता छत्रपती शिवाजी महाराज येत होते, असे सांगितले जाते. महाशिवरात्रीनिमित्त या मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. त्यामुळे परिसरात मोठी गर्दी होती. या ठिकाणी संजोग वाघेरे यांच्या पुढाकाराने स्वयंसेवक भाविकांची सेवा करीत होते. गर्दीतील नागरिकांना सर्वोतोपरी मदत करुन मंदिर व्यवस्थापनाला नियोजनामध्ये सहकार्य करीत होते. महाशिवरात्रीच्या आदल्या दिवसापासून १२ स्वयंसेवक वाहतूक व्यवस्था, भाविकांना मदत आणि परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करिता सतर्क होते. त्यामुळे भाविकांनी संजोग वाघेरेंच्या या उपक्रमाचे कौतूक केले. यापूर्वीच आयटी हब हिंजवडीसह पिंपरी-चिंचवड परिसरातील गर्दीच्या ठिकाणी संजोग वाघेरे यांनी स्वयंस्फूर्तीने वाहतूक नियंत्रक स्वयंसेवक तैनात केले आहेत. सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी या स्वयंसेवकांमुळे वाहतूक सुरळीत होण्यास मदत होत आहे.

### शिवमंदिरांमध्ये श्रींचे दर्शन दौरा...

» लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धुमधाम सुरू असतानाच संजोग वाघेरे यांनी महाशिवरात्रीनिमित्त शहरातील विविध शिव मंदिरांमध्ये भेट दिली. तसेच, आयोजित उपक्रमांमध्ये सहभागी झाले. शिवशंभो सेवा मंडळाच्या वतीने पिंपळे सौदागर येथील आयोजित महाशिवरात्री महोत्सव, निगडी प्राधिकरण येथील श्री सोमेश्वर मंदिर, निळकंठेश्वर मंदिर, केदारेश्वर मंदिराला भेट दिली आणि श्रींचे दर्शन घेतले. तसेच, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित महाशिवरात्री महोत्सवातही त्यांनी सहभाग घेतला. चिंचवड गाव येथील श्री घनेश्वर मंदिर व्यवस्थापन, श्री विठ्ठल महादेव मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अजिंक्य मित्र मंडळाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या आरोग्य शिबीर आणि रक्तादान शिबिरालाही संजोग वाघेरे यांनी भेट दिली.



## भूमिका

**लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी आता चांगलीच सुरू झाली आहे. देशभरातल्या विविध राजकीय पक्षांच्या उमेदवार याद्या प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. एका बाजूला सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी तर दुसऱ्या बाजूला तिला पराभूत करण्यासाठी आणि संविधान व लोकशाही वाचवण्याची हाळी देणारी इंडिया आघाडी आकाराला आलेली आहे. मात्र इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे जागावाटप अद्याप प्रलंबित आहे.**

# आंबेडकरी चळवळीला प्रतिनिधित्व मिळेल काय?

महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), डावे पक्ष यांची महाविकास आघाडी अस्तित्वात आहे. त्यांच्यासोबत आंबेडकरी चळवळीतील प्रमुख नेते अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी सहभागी व्हावी, यासाठी सातत्याने चर्चांच्या फेऱ्या सुरू आहेत. मात्र महाविकास आघाडीत अजूनही वंचित बहुजन आघाडीचा समावेश खऱ्या अर्थाने झालेला नाही. महायुती आणि महाविकास आघाडी दोघांचेही जागावाटप लांबले आहे.या साऱ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळीमध्ये सातत्याने अग्रभागी असणाऱ्या आंबेडकरी चळवळीचे अस्तित्व आहे कुठे? आंबेडकरी नेतृत्व तथा या चळवळीचे राजकीय रूप असणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व आहे कुठे, असा सवाल उपस्थित होत आहे. दोन्ही आघाड्यांच्या जागा वाटपाच्या




गदारोळात राजकीयदृष्ट्या दखलपात्र असणाऱ्या आंबेडकरी चळवळीला कोणत्याच आघाडीत पुरेसे स्थान मिळालेले अद्यापही दिसून येत नाही. किंबहुना या चळवळीतील राजकीय नेतृत्वाला दुर्लक्ष करून निष्प्रभ करण्यात आल्याचे दिसून येत आहे. आंबेडकरी चळवळीतील विखंडित असणाऱ्या रिपब्लिकन नेतृत्वाला ना याविषयी खेद, ना खंत !रिपब्लिकन पक्षाचा प्रत्येक गटाधिपती वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या मागे धावण्याचा प्रयत्न उगाचच करताना दिसून येत आहे. कुठूनही काहीही अद्याप मिळालेले नाही. दोन्ही आघाड्यांत रिपब्लिकन नेतृत्वाच्या अस्तित्वाचा साधा उल्लेखही करताना दिसून येत नाही. दहा वर्षांपूर्वीपर्यंत राज्यकर्त्यांना रिपब्लिकन पक्षाच्या सोबतीची, त्यांच्या अस्तित्वाची, सहकार्याची गरज वाटत होती. मात्र गेल्या दहा- पंधरा वर्षात रिपब्लिकन नेतृत्वाने आंबेडकरी राजकारणाचा केलेला विचका आणि चळवळीचे त्यातून झालेले अवमूल्यन यामुळे राजकीय दबाव गट म्हणून असलेले वजन रिपब्लिकन नेतृत्व गमावून बसले आहे. त्यामुळेच आज ही परिस्थिती ओढवली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ आणि रिपब्लिकन पक्ष यांचे अतूट नाते. आंबेडकरी चळवळीच्या या राजकीय पक्षाचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये अॅड. प्रकाश आंबेडकर व रामदास आठवले हे दोन प्रमुख नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्याखेरीज प्राध्यापक जोगेंद्र कवाडे, रा. सु. गवई यांच्या पश्चात त्यांचे पुत्र डॉक्टर राजेंद्र गवई आणि इतर काही रिपब्लिकन नेते यांचाही समावेश आहे. बहुजन समाज पार्टी या पक्षाचे काम करणारेही काही नेते आंबेडकरी चळवळीतूनच पुढे आलेले आहेत. मात्र महाराष्ट्राच्या राजकारणात आंबेडकरी चळवळीला सोबत घेण्यासाठी प्रामुख्याने अॅड. प्रकाश आंबेडकर आणि रामदास आठवले यांना सोबत घेण्याचा प्रयत्न प्रस्थापित राजकीय पक्षांकडून होत असतो. या पार्श्वभूमीवर गेल्या दहा वर्षांपासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले हे सत्ताधारी भाजप सोबत सत्तेत आहेत, तर दुसऱ्या बाजूला प्रकाश आंबेडकर यांनी रिपब्लिकन पक्षापासून सुरू केलेला प्रवास पुढे भारिप बहुजन महासंघ ते आता वंचित बहुजन आघाडीपर्यंत पोहोचला आहे.२०१८ साली राज्यातील वंचित आणि बहुजन समाजाला सोबत जोडण्याचा एक चांगला प्रयत्न करून रिपब्लिकन पक्षाशी असलेले नाते बाजूला सारून वंचित बहुजन आघाडी या नव्या राजकीय पक्षाची स्थापना करण्यात आली. गेल्या पाच-सहा वर्षांपासून अत्यंत ताकतीने काम सुरू आहे. बाळासाहेब बहुजन समाजाला आपल्या सोबत घेऊन पक्षाची बांधणी करत आहेत. स्वतःचे एक स्वतंत्र स्थान त्यांनी निर्माण केले आहे. त्यांची एक ठाम वैचारिक भूमिका आहे. गेल्या काही वर्षांत सत्ताधारी भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यावर कठोर टीका करतानाच सत्ताधारी व विरोधी पक्षांवरही त्यांनी शरसंधान केले आहे.

## संपादकीय »

# महाराष्ट्र परी

***केंद्राच्या पाठिंब्यामुळे महाराष्ट्रासाठी परिस्थिती प्रतिकूल नसली तरी ती अत्यंत अनुकूल आहे असेही नाही, हे आपले राज्यकर्त्यांनी ओळखल्यास बरे..***

दावोस येथे आल्प्सच्या बर्फाच्छादित कुशीत गुंतवणूकदार, उद्योगपती आणि धोरणकर्त्यांच्या वार्षिक कुंभमेळयात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री काही हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूक वायद्यांची घोषणा करीत असताना त्याच वेळी दिल्लीतून महाराष्ट्र नवउद्यमींच्या गुंतवणुकीत मागे पडल्याची वार्ता ही दावोसोत्सवाचा बर्फ वितळवणारी ठरते. अलीकडे हे महाराष्ट्राच्या बाबत वारंवार होऊ लागले आहे हे कटुसत्य. एखादा प्रकल्प या राज्यातून दुसरीकडे जाणे इतक्यापुरतेच ते मर्यादित नाही. महाराष्ट्रापुढे गेले. त्याच वर्षी 'निती आयोग'रचित 'निर्यातस्नेही' राज्यांच्या गुणवत्ता तालिकेत गुजरात हा सहोदर आपल्यापेक्षा पुढे गेल्याचे दिसले. त्याही आधी उद्योगस्नेही धोरणांत अन्य राज्ये महाराष्ट्रावर सातत्याने मात करत असल्याचे दिसून आले. ही सर्व निरीक्षणे केंद्र पुरस्कृत विविध यंत्रणांची आहेत आणि केंद्रात सरकार भाजपचे आहे.

आदिम जमातीचे भीषण दारिद्र्य, वेठबिगारी हे समाजाला असलेले कलंक आहेत आणि ते नष्ट करण्यात राजकीय व्यवस्थेला अपयश आले आहे", याची प्रामाणिक कबुली महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदिम जमातीच्या प्रश्नांवर राज्यातील विविध विभागांच्या प्रधान सचिवांच्या बैठकीची सुरुवात केली.

# उत्तरदायित्वाच्या निश्चितीचे ऐतिहासिक पाऊल!

आजही समाजाचा मोठा भाग सन्मानाने जगण्याच्या हक्कासारख्या, अन्न – शिक्षणाच्या हक्कासारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित आहे. २९ सप्टेंबर २०१० रोजी आधार कार्ड देण्याची योजना सुरू झाली. मात्र १४ वर्षांनंतरही केवळ सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपणामुळे आजही आदिम जमातीच्या १०० पैकी ३० लोकांकडे आधार कार्ड, रेशन कार्ड, जॉब कार्ड नाही. ८० हून अधिक लोकांचे बँकेत खाते नाही आणि मागासलेपणामुळे त्याबाबतची जागरूकता त्यांच्याकडे नाही. मग आधार कार्डाचे अर्ज भरून कोण देणार? २००९ साली शिक्षणाचा हक्क आला, मात्र आजही आदिम जमातीच्या हजारो मुलांना आधार कार्ड नाही, जातीचा दाखला नाही या सबबीखाली शिक्षण नाकारले जाते. अनेक आदिवासी आजही शिक्षणापासून वंचित आहेत. आधार कार्ड, जातीचा दाखला अशा आवश्यक बाबींची पूर्तता आदिवासींकडून करून कोण घेणार? आजही लाखो आदिवासींकडे पक्के घर नाही. अन्नाचा हक्क कायद्याने दिला, पण



आजही कुपोषणाचा शाप आदिवासींच्या माथी आहेच. स्वातंत्र्य मिळवून ७७ वर्षे होऊनही आजही भुकेने आदिवासी मरतो आहे. आरोग्याच्या सोयीच्या अभावाने जीव गमावतो आहे. जिवंत राहायला हाताला रोजगार नाही. या मूलभूत सोयीसुविधांपर्यंत आदिवासी पोहोचू शकत नसेल तर, या सोयीसुविधा त्याच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम कोणाचे?आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, जातीचा दाखला, बँक खाते इत्यादी किमान अस्तित्व सिद्ध करणाऱ्या पुराव्यांपैकी एकही पुरावा बहुतांश आदिवासींकडे नाही. घरकुल योजना आहे, पण कागदावरचे घर अद्याप प्रत्यक्षात उतरलेले नाही. वन जमिनीवरील घरे, वस्तीस्थाने मंजूर करण्याबाबत वन कायद्यात तरतूद आहे, पण अशी वन हक्कांची प्रकरणे प्रशासनाकडे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. असे अनेकजण आहेत की जे दावेच भरू शकलेले नाहीत. मग त्यांच्या जीवितासंबंधीच्या किमान हक्कांची जाणीव त्यांच्यात निर्माण कोण करणार? त्यांना हे हक्क मिळवून देण्याचे कर्तव्य कोणाचे ? वेठबिगार निर्मूलनाचा कायदा १९७६ ला झाला, पण वीटभट्टीवर, दगडखाणीवर, शेतमळ्यावर आजही आदिवासी गुलामीच्या जोखडात आहे. बयानाच्या आडून मालकांची गुलामी आणि त्यातून होणारे अमानवी शोषण आजही आहेच. वेठबिगार शोधून त्यांना मालकांच्या गुलामीतून मुक्त करायचे दायित्व कुणाचे? बालमजुरी विरोधी कायदा १९८६ ला झाला, पण आजही लहान मुले शाळा सोडून वीटभट्टीवर, मळ्यात आजोबाने घेतलेले कर्ज बाबाच्या मृत्यूमागे फेडताना दिसतात. त्या आडून होणाऱ्या त्याच्या वा तिच्या शोषणाच्या घटना पुढे येत आहेत, हे दुर्दैवी वास्तव बदलणार कोण?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्याचे चौथे महिला धोरण जाहीर!

## अधिकृत कागदपत्रांवर आईचे नाव लावणे बंधनकारक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने राज्याचे चौथे महिला धोरण जाहीर करण्यात आले आहे. याबाबतची माहिती राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी X वर पोस्ट करत दिली आहे. ”आंतरराष्ट्रीय महिला दिनी राज्याचे चौथे महिला धोरण लागू करण्यात येतं आहे. लेक लाडकी योजना, महिला सशक्तीकरण अभियान, मनोधैर्य योजना, महिला सक्षमीकरण केंद्र अशा विविध योजनांतून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व सक्षमीकरणासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त करूया.” असे तटकरे यांनी म्हटले आहे.**




### चौथे महिला धोरण जाहीर

राज्याचं चौथं महिला धोरण राज्यातील महिलाशक्तीसाठी यंदाच्या जागतिक महिला दिनाची आगळीवेगळी भेट असून ही भेट कायम स्मरणात राहिल, असे अजित पवार यांनी पुढे नमूद केले आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने राज्याचे चौथे महिला धोरण जाहीर करण्यात आले आहे. लेक लाडकी योजना, महिला सशक्तीकरण अभियान, मनोधैर्य योजना, महिला सक्षमीकरण केंद्र अशा विविध योजनांतून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व सक्षमीकरणासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त करूया.” असे तटकरे यांनी म्हटले आहे.

विशेष म्हणजे सरकारी आणि खासगी क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गर्भवती महिलांसाठी घरून कामाला प्रोत्साहन देण्याची शिफारस या धोरणातून करण्यात आली आहे.मागील तीन वर्षांपासून रखडलेले राज्याचे चौथे महिला धोरण आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी महिला आणि बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी जाहीर केले.

सह्याद्री विश्रामगृहात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यक्रमात हे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात महिलांसाठी अष्टसूत्री कार्यक्रम आखण्यात आला आहे.

या महिला धोरणाचा मसुदा तीनवेळा बदलण्यात आला. आता अष्टसूत्रीच्या माध्यमातून विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती तटकरे यांनी दिली.राज्यातील दुर्लक्षित, दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण अशा आदिवासी भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेणे. तसेच कर्करोग, मूत्रमार्ग संक्रमण, क्षयरोग, रजोनिवृत्तीच्या समस्या इत्यादींसाठी निदान आणि उपचार सुविधा उपलब्ध, महिलांची संख्या जास्त असलेल्या आस्थापनांच्या ठिकाणी पाळणाघर, आदिवासी मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष, सर्व पोलिस मुख्यालयांमध्ये भरोसा कक्ष स्थापन करण्याची तरतूद या धोरणात करण्यात आली आहे. राज्याचं नवीन महिला धोरण जाहीर केल्याबद्दल राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे. महिला दिनी राज्याचं चौथं महिला धोरण अंमलात आणून महाराष्ट्रानं राज्यातील महिलाशक्तीला नवी ऊर्जा, नवी उमेद, नवं बळ दिलं आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार दृढ केला आहे.

महिलांचे आरोग्य, महिलांना पोषक आहार, महिलांचे शिक्षण व कौशल्यवृद्धी, महिलांची सुरक्षा, महिलांसाठी रोजगारनिर्मिती, निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग, महिला खेळाडूंना आर्थिक सहाय्य, सांस्कृतिक क्षेत्रात सहभाग वाढवण्यासारख्या निर्णयांच्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाची मजबूत पायाभरणी केली असल्याचे अजित पवार यांनी X वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती, त्यानंतर महिला व बाल विकासमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वेगळी समिती, जिल्हास्तरीय अंमलबजावणीसाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती काम करणार आहे. या समित्यांच्या संपर्क, संवाद, समन्वयातून महिला धोरणाची राज्यात अंमलबजावणी प्रभावी होईल, महिलांच्या सक्षमीकरणाला गती मिळेल, असा विश्वास आहे. राज्याच्या चौथ्या महिला धोरणामुळे महिलांना सर्वक्षेत्रात समान संधी, शासन-प्रशासनात योग्य स्थान, अर्थसंकल्पात योग्य तरतूद, रोजगार-स्वयंरोजगारात समान संधी, कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण, संपत्तीत समान वाटा, उद्यमी महिलांसाठी मार्गदर्शन व बाजारपेठ, आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळणार आहेत.

यापुढे अधिकृत कागदपत्रांवर आईचे नाव लावणं बंधनकारक होणार आहे. निमशासकीय तसंच खाजगी कंपन्यांनीही मातृत्व आणि पितृत्व रजा द्यावी, असा प्रस्ताव आहे. सरकारी व खाजगी क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गर्भवती महिलांसाठी घरून कामाला प्रोत्साहन देण्याची शिफारस धोरणात करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातले भाजपाचे उमेदवार ठरले : दानवे

## शिवसेना आणि राष्ट्रवादीकडे कोणत्या जागा येणार याचा सस्पेन्स कायम

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचा जागा वाटपचा पेच अद्याप सुटलेला नाही अशा चर्चा आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी मित्र पक्षांचा सन्मान करु असं म्हटलं आहे. तर दुसरीकडे शिंदेंना जितक्या जागा सोडाल तितक्याच आम्हालाही हव्या असा आग्रह अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही धरला आहे.**



### सस्पेन्स मात्र कायम आहे

रावसाहेब दानवे हे भाजपातले ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे जर धुळे, जळगाव, रावेर, भंडारा, अकोला, गडचिरोली, पालघर, भिवंडी या ठिकाणचे उमेदवार ठरले असण्याची शक्यता आहे. मात्र कुठल्या जागा भाजपा लढणार? कुठल्या शिवसेना आणि कुठल्या राष्ट्रवादीकडे येणार याचा सस्पेन्स मात्र कायम आहे.

लोकसभेच्या ४८ जागांचा तिढा कसा सुटणार याच्या चर्चा रंगल्या आहेत. अशात रावसाहेब दानवेंनी भाजपाचे कुठले आणि किती उमेदवार ठरले ती यादीच वाचली आहे. भाजपाचे नेते रावसाहेब दानवे हे आज नाशिकमध्ये होते. त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.त्यावेळी त्यांनी एक कृती केली ज्याची चर्चा चांगलीच रंगली आहे. पत्रकारांनी नाशिकमध्ये रावसाहेब दानवे यांना महायुतीच्या जागावाटपाविषयी विचारलं असता त्यांनी आपल्या खिशात असलेली यादीच वाचून दाखवली. त्यामुळे आता या यादीची चर्चा रंगली आहे.“हे कागद आहेत कालचे आहेत, कॅमेरा नको मारुस याच्यावर. धुळे, जळगाव, रावेर, भंडारा, अकोला, गडचिरोली, नाशिक, पालघर, भिवंडी हे सगळ्या महाराष्ट्रातले उमेदवारच आहेत. आमची कालच याबद्दल चर्चा झाली.” असं रावसाहेब दानवेंनी म्हटलं आहे. ही यादी काही त्यांनी पत्रकारांना दाखवली नाही. पण ही यादी त्यांनी वाचून दाखवली. त्यामुळे महायुतीचे उमेदवार लवकरच जाहीर होतील अशी चिन्हं आता आहेत. तसंच रावसाहेब दानवेंच्या या कृतीची चर्चा नाशिकमध्ये चांगलीच रंगली आहे. पत्रकार नाशिकचा उमेदवार कोण हे विचारत होते पण तेदेखील रावसाहेब दानवेंनी काही सांगितलं नाही.

# सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुधा मूर्ती यांचं केलं अभिनंदन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रसिद्ध लेखिका, इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि इन्फोसिसचे सह-संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून सुधा मूर्ती यांचं अभिनंदन केलं आहे. तसेच या निवडीबाबत आनंद व्यक्त केला. दरम्यान, राज्यसभेवर निवड झाल्यानंतर सुधा मूर्ती यांनी म्हटलं आहे की, त्या सध्या भारतात नाहीत. परंतु, महिला दिनानिमित्त त्यांना मिळालेली ही मोठी भेट आहे. देशासाठी काम करण्यासाठी एक नवीन जबाबदारी मिळाली आहे. मूर्ती यांनी या निवडीबाबत राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, राष्ट्रपतींनी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड केल्याचा मला खूप आनंद झाला आहे. सामाजिक कार्य आणि शिक्षण क्षेत्रात सुधा मूर्ती यांनी अतुलनीय आणि प्रेरणादायी योगदान दिलं आहे. राज्यसभेतील त्यांची उपस्थिती हा आपल्या नारी शक्तीचा एक सशक्त पुरावा आहे. आपल्या देशाचं भवितव्य घडवण्यात महिलांचा मोठा वाटा आहे. सुधा मुर्ती यांची राज्यसभेतील उपस्थिती महिलांची ताकद आणि क्षमता दर्शवते. यशस्वी संसदीय कार्यकाळासाठी मी सुधा मूर्ती यांना शुभेच्छा देतो.सुधा मूर्ती यांनी तीन महिन्यांपूर्वी नव्या संसद भवनाचा दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी संसदेच्या दोन्ही इमारती पाहिल्या. त्यानंतर त्या म्हणाल्या, "ही इमारत खूपच सुंदर आहे. मला प्रदीर्घ काळापासून या ठिकाणी भेट द्यायची होती आणि आज तो योग आला" दरम्यान, त्यावेळी मूर्ती यांना प्रश्न विचारण्यात आला होता की, तुम्ही राजकारणात यायचा विचार केला आहे का? यावर सुधा मूर्ती म्हणाल्या, मी जिथे आहे तिथे खुश आहे. मला राजकारणात वगैरे मुळीच यायचं नाही.सुधा मूर्ती इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत. तसेच त्या लेखिका म्हणूनही जगभर प्रसिद्ध आहेत. सुधा मुर्ती या महिला आणि लहान मुलांसाठी काम करत आहेत. त्यांची संस्थादेखील यासाठी देशाच्या विविध भागांमध्ये काम करतेय.सुधा मूर्ती यांचे पती नारायण मूर्ती यांनी १९८१ मध्ये इन्फोसिसची स्थापना केली होती. त्यासाठी सुरुवातीच्या काळात सुधा मूर्ती यांनी नारायण मूर्ती यांना १०,००० रुपये उधार दिले होते. सुरुवातीच्या काळात मुर्ती दाम्पत्य एका छोट्याशा घरात भाड्याने राहत होते. त्या काळात त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. आज त्यांची इन्फोसिस ही देशातली दुसरी सर्वात मोठी आयटी कंपनी आहे. त्याचबरोबर जगभरातल्या नावाजलेल्या आयटी कंपन्यांमध्ये इन्फोसिसचं नाव घेतलं जातं. इन्फोसिसमध्ये ३ लाखांहून अधिक कर्मचारी काम करत आहेत. मूर्ती यांच्या मुलाचीही स्वतःची स्वतंत्र कंपनी आहे. त्याचबरोबर त्यांच्या मुलीचा इंग्लंडमध्ये मोठा व्यवसाय आहे. इंग्लंडचे पंतप्रधान ऋषी सुनक हे मूर्ती यांचे जावई आहेत.आपल्या देशाचं भवितव्य घडवण्यात महिलांचा मोठा वाटा आहे. सुधा मुर्ती यांची राज्यसभेतील उपस्थिती महिलांची ताकद आणि क्षमता दर्शवते. यशस्वी संसदीय कार्यकाळासाठी मी सुधा मूर्ती यांना शुभेच्छा देतो. सुधा मूर्ती यांनी तीन महिन्यांपूर्वी नव्या संसद भवनाचा दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी संसदेच्या दोन्ही इमारती पाहिल्या. त्यानंतर त्या म्हणाल्या, "ही इमारत खूपच सुंदर आहे. मला प्रदीर्घ काळापासून या ठिकाणी भेट द्यायची होती आणि आज तो योग आला" दरम्यान, त्यावेळी मूर्ती यांना प्रश्न विचारण्यात आला होता की, तुम्ही राजकारणात यायचा विचार केला आहे का? यावर सुधा मूर्ती म्हणाल्या, मी जिथे आहे तिथे खुश आहे. मला राजकारणात वगैरे मुळीच यायचं नाही.सुधा मूर्ती इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत.

### सुधा मूर्ती सध्या भारतात नाहीत

तसेच त्या लेखिका म्हणूनही जगभर प्रसिद्ध आहेत. सुधा मुर्ती या महिला आणि लहान मुलांसाठी काम करत आहेत. त्यांची संस्थादेखील यासाठी देशाच्या विविध भागांमध्ये काम करतेय.सुधा मूर्ती यांचे पती नारायण मूर्ती यांनी १९८१ मध्ये इन्फोसिसची स्थापना केली होती. त्यासाठी सुरुवातीच्या काळात सुधा मूर्ती यांनी नारायण मूर्ती यांना १०,००० रुपये उधार दिले होते. सुरुवातीच्या काळात मुर्ती दाम्पत्य एका छोट्याशा घरात भाड्याने राहत होते. त्या काळात त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. आज त्यांची इन्फोसिस ही देशातली दुसरी सर्वात मोठी आयटी कंपनी आहे. प्रसिद्ध लेखिका, इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि इन्फोसिसचे सह-संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून सुधा मूर्ती यांचं अभिनंदन केलं आहे. तसेच या निवडीबाबत आनंद व्यक्त केला. दरम्यान, राज्यसभेवर निवड झाल्यानंतर सुधा मूर्ती यांनी म्हटलं आहे की, त्या सध्या भारतात नाहीत.

# मी तुरुंगाबाहेर जिवंत आलो हा चमत्कारच : साईबाबा

## जी. एन. साईबाबा यांची 10 वर्षांनी तुरुंगातून सुटका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक जी. एन. साईबाबा यांना ७ मार्च रोजी तुरुंगातून सोडण्यात आलं. १० वर्षांनी त्यांना तुरुंगातून सुटका करण्यात आली आहे. यानंतर जी.एन. साईबाबा यांनी याबाबत माध्यमांना प्रतिक्रिया देताना सांगितलं आहे की तुरुंगात मी अत्यंत हलाखीचे दिवस काढले. तरीही मी तुरुंगाबाहेर जिवंत कसा आलो याचंच मला आश्चर्य वाटतं आहे.**

५ मार्चला न्यायालयाने साईबाबा यांना तुरुंगातून मुक्त करण्याचे आदेश दिले. महाराष्ट्र पोलीस जी. एन. साईबाबा यांच्या विरोधातले आरोप सिद्ध करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांना सोडण्यात येतं आहे. आता महाराष्ट्र सरकारने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे.नक्षलवाद्यांशी असलेल्या कथित संबंधांच्या आरोपांखाली अटकेची कारवाई झालेले दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक जी.एन. साईबाबा आणि इतर पाच जणांची नुकतीच मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात निर्दोष मुक्तता केली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात



यासंदर्भातली सुनावणी पूर्ण झाली होती. ५ मार्चला न्यायालयाने साईबाबा यांना तुरुंगातून मुक्त करण्याचे आदेश दिले. महाराष्ट्र पोलीस जी. एन. साईबाबा यांच्या विरोधातले आरोप सिद्ध करु शकले नाहीत.मात्र, न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला होता. अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं साईबाबा व त्यांच्यासह इतर पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याचा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.न्यायमूर्ती विनय जोशी व न्यायमूर्ती वाल्मिकी एस. ए. मेनेझेस यांच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली होती. साईबाबा व इतर पाच जणांवर सत्र न्यायालयाने २०१७ साली दोषनिश्चिती केली होती. त्याविरोधात करण्यात आलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयासमोर सविस्तर सुनावणी पार पडल्यानंतर न्यायालयाने यासंदर्भातला निकाल दिला.

### माझं हृदय 55 टक्के काम करतं

"मे २०१४ मध्ये मला तुरुंगात धाडण्यात आलं, त्यावेळी मला पोलिओ होता. पण मी सुदृढ होतो. आता मला हृदयरोगाचा त्रास आहे. तसंच स्नायूंचाही आजार जडला आहे. स्वादुपिंडाच्याही समस्या आहेत. मला डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला होता पण त्या होऊ शकल्या नाहीत. माझं हृदय ५५ टक्के काम करतं आहे. मी स्वच्छतागृहातही एकटा जाऊ शकत नाही. मला आधार दिल्याशिवाय अंघोळही करता येत नाही. डॉक्टरांना हे सगळं सांगितलं तरीही माझ्यावर उपचार करण्यात आले नाहीत.

# सनीने केला मराठी गाण्यावर जबरदस्त डान्स



बॉलीवूड अभिनेत्री सनी लिओनी तिच्या बोल्ड अंदाजामुळे नेहमी चर्चेत असते. अभिनयाबरोबरच आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दलचे अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. उत्तम डान्सर असलेली सनी लिओनी नुकतीच मराठी गाण्यावर थिरकली होती. सनीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. हता दुर्गुळे अभिनीत ‘कन्नी’ या मराठी चित्रपटातील ‘नवरोबा नवरोबा’ गाण्यावर सनी हटके डान्स मूव्हज करताना पाहायला मिळतेय. क्रॉप टॉप आणि मिनी स्कर्ट असा को-ऑर्ड सेट तिने या गाण्यासाठी परिधान केला आहे. निळ्या रंगाच्या बूट्स आणि मॅचिंग हॅटची निवड करीत सनीने हा लूक पूर्ण केला आहे.

# राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं..!

प्रसिद्ध फिल्ममेकर आणि कोरिओग्राफर फराह खानने शाहरुख खानच्या ‘मैं हूं ना’ या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शनात पदार्पण केले. शाहरुख खानची प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. या चित्रपटात झायेद खान, सुष्मिता सेन, अमृता राव आणि सुनील शेट्टी यांसारखे दिग्गज कलाकारही मुख्य भूमिकेत होते. फराहने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत या सगळ्यांना एका चित्रपटासाठी एकत्र आणण्यात आलेल्या आव्हानांबद्दल खुलासा केला आहे. या चित्रपटाच्या कास्टिंगसाठी फराह खानला बऱ्याच समस्या आल्या. याबद्दलच तिने मॅशेबल इंडियाच्या ‘द बॉम्बे ड्रीम शोम’ध्ये कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाब्रा यांच्याशी संवाद साधताना खुलासा केला. शाहरुखने एका झटक्यात तिच्या चित्रपटाला होकार दिला, पण इतरांचं कास्टिंग करताना मात्र फराहला खूपच त्रास झाला. झायेद खानच्या भूमिकेसाठी याआधी हृतिक रोशन, अभिषेक बच्चन व सोहेल खान यांना विचारण्यात आलं होतं अन् अमृता रावच्या भूमिकेसाठी प्रथम आयेशा टाकीया ही फराहची पहिली पसंती होती. हे तिने या मुलाखतीदरम्यान स्पष्ट केलं.या चित्रपटातील खलनायक म्हणजेच राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं हादेखील फराहसमोर एक मोठा प्रश्न होता. या भूमिकेसाठी शाहरुखच्या आग्रहाखातर फराहने कमल हासन यांनाही विचारलं होतं, शाहरुखच्या चित्रपटाला ते नकार देणार नाहीत.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वतःचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# राधिकाने चित्रपटातील संवाद केले कॉपी!

मुकेश अंबानी व नीता अंबानी यांचे छोटे सुपुत्र अनंत अंबानी यंदा लग्नबंधनात अडकणार आहेत. जुलै महिन्यात राधिका मर्चंटशी अनंत अंबानी लग्नगाठ बांधणार आहेत. त्याआधी नुकताच जामनगरमध्ये दोघांचा मोठ्या थाटामाटात प्री-वेडिंग सोहळा पार पडला. १ मार्च ते ३ मार्च असा तीन दिवसांच्या या सोहळ्यात देश-विदेशातून दिग्गज मंडळी उपस्थित राहिली होती. अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा देशासह जगभरात अजूनही सुरू आहे. फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. अशातच प्री-वेडिंग सोहळ्यात मुकेश अंबानींच्या धाकट्या सूनेने दिलेल्या भाषणात हॉलीवूड चित्रपटातील संवाद कॉपी केल्याचं समोर आलं आहे. यासंबंधित व्हिडीओ सोशल मीडियावर खूपच चर्चेत आला आहे.अनंत अंबानींची होणारी पत्नी राधिका मर्चंट हिने अंबानी कुटुंबासाठी एका भाषणातून भावना व्यक्त केल्या होत्या. मुकेश अंबानींपासून ते श्लोका मेहतापर्यंत अंबानी कुटुंबातील प्रत्येक सदस्याविषयी राधिका बोलली होती. यावेळी तिने होणारे पती अनंत यांच्यासाठी हृदयस्पर्शी भाष्य केलं. जे ऐकून नेटकऱ्यांना एका हॉलीवूड चित्रपटाची आठवण झाली.राधिकाचा हा व्हिडीओ ‘सादिक सलीम’ या इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये २००४ साली प्रदर्शित झालेल्या SHALL WE DANCE? या चित्रपटातील संवाद अंबानींच्या होणाऱ्या सूनेने आपल्या भाषणात कॉपी केले आहेत. या चित्रपटात अभिनेत्री सुसान सरंडन हे संवाद म्हणताना दिसत आहेत. तिचे हेच संवाद शब्दशः राधिका बोलताना पाहायला मिळत आहे. ‘विटनेस टु योर लाइफ’ असं या संवादाचे नाव आहे. राधिकाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी राधिकाला ट्रोल केलं आहे. तर काही नेटकऱ्यांनी तिचं समर्थन केलं आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, ‘चॅटजीपीटीने सुद्धा चांगले संवाद लिहून देण्याच काम केलं असतं.’ तसंच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, ‘एवढा पैसा खर्च केला. तर एखाद्या संवाद लेखकाला कामासाठी घेऊ शकला असता.’ तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, ‘आता हिला आरामात चित्रपटाच्या ऑफर मिळतील.’ अशा अनेक प्रतिक्रिया या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.दरम्यान, अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा झाला. यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींनी जबरदस्त परफॉर्मन्स केला. तिसऱ्या दिवशी, ३ मार्चला ‘टस्कर ट्रेल्स’ आणि ‘हस्ताक्षर’ कार्यक्रम झाला. ‘टस्कर ट्रेल्स’ हा आउटडोअर कार्यक्रम होता.

# अमिषा पटेल व्याजासहित पैसे द्यायला तयार



चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटेलनं तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल. न्यायालयाने अमिषा पटेलला आज (7 मार्च) जबाबा नोंदवण्यासाठी कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराचा जबाब नोंदवल्यानंतरआता अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. यासाठी दोघांनाही न्यायालयात हजर रहावं लागणार आहे.रांचीच्या अरगोरा येथील रहिवासी असलेले चित्रपट निर्माता अजय कुमार सिंह यांनी देसी मॅजिक चित्रपट बनवण्यासाठी अमिषा पटेलला अडीच कोटी रुपये दिले होते, पण या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली नाही. यानंतर अजय कुमार सिंह यांनी अमिषा पटेलकडे पैसे परत मागितले. अमिषानं अजय कुमार सिंह यांना दोन चेक दिले, हे चेक बाऊंस झाले. या प्रकरणी अजय कुमार सिंह यांनी 2018 मध्ये अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अमिषा पटेलने 17 जून रोजी रांची दिवाणी न्यायालयात आत्मसमर्पण केले होते. सध्या अमिषा ही जामिनावर आहे. अमिषा पटेलचा गदर-2 हा चित्रपट गेल्या वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड ब्रेक कमाई केली आहे. आता अमिषाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटेलनं तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल.

# रोहित शर्माची धुव्वाधार बॅटींग!

## जेम्स अँडरसनपासून शोएब बशीरपर्यंत सर्वांनाच धुतले

नवी दिल्ली। । वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यात धरमशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट स्टेडियमवर पाचवा आणि अंतिम कसोटी सामाना खेळल्या जात आहे. भारताच्या पाचव्या कसोटीच्या पहिल्या डावात कर्णधार रोहित शर्माने जोरदार फलंदाजी केली. आपल्या संघासाठी त्याने शानदार शतक केले. या सामन्यात त्याने इंग्लंडच्या एकाही गोलंदाजाला सोडले नाही आणि सर्वांविरुद्ध जोरदार फटकेबाजी केली.**

रोहित शर्माने 154 चेंडूत आपले शतक पूर्ण केले. रोहित शर्माने केवळ वेगवान गोलंदाजांविरुद्धच नव्हे तर फिरकीपटूंविरुद्धही चांगली फलंदाजी केली. बऱ्याच दिवसांपासून रोहित शर्मा चांगली सुरुवात करत होता. पण त्याला चांगली धावसंख्या उभारता आली नाही. मात्र, या सामन्यात रोहित शर्माने जबरदस्त फलंदाजी केली. या मालिकेतील त्याचे हे दुसरे शतक आहे. हैदराबादमध्ये खेळली गेलेली पहिली कसोटी इंग्लंडने जिंकली होती. मात्र, यानंतर भारतीय संघाने या मालिकेत चांगले पुनरागमन केले आणि सलग तीन कसोटी जिंकल्या. 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारत सध्या 3-1 ने आघाडीवर आहे. या संपूर्ण मालिकेत भारतीय संघातील खेळाडूंनी चांगली फलंदाजी आणि गोलंदाजी केली आहे.अंतिम कसोटीत इंग्लंडने पहिल्या डावात सर्व गडी गमावून 218 धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने पहिल्या डावात ५ तर रविचंद्रन अश्विनने ४ बळी घेतले. जडेजाने एक विकेट घेतली. या सामन्यात भारतीय संघासाठी सर्वात चांगली गोष्ट म्हणजे त्यांनी आघाडी घेतली आहे आणि इंग्लंडला पूर्ण दडपणाखाली ठेवले आहे. इंग्लंडला या सामन्यात पुनरागमन करायचे असेल तर त्यांना येथून सलग विकेट्स घ्याव्या लागतील.भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी पहिले सत्र रोहित शर्मा आणि शुभमन गिलने गाजवले. रोहितने सावध खेळत



आपले 12 वे कसोटी शतक पूर्ण केले. तर शुभमन गिलने आक्रमक फटकेबाजी करत रोहितच्या आधी आपले चौथे कसोटी शथक पूर्ण केलं. पहिल्या सत्राअखेर भारताच्या 264 धावा झाल्या असून संघाकडे 46 धावांची महत्वपूर्ण आघाडी आहे.

दरम्यान, या शतकी खेळीनंतर रोहित शर्माने भारताचा प्रशिक्षक आणि माजी कर्णधार राहुल द्रविडच्या विक्रमाशी बरोबरी केली. जरी रोहित अन् शुभमन गिलने शतकी खेळी केली असली तरी सत्र संपल्यावर पॅव्हेलियनमध्ये जाताना रोहितने शुभमन गिलला लिड घेण्यास सांगितले.रोहित शर्माने 154 चेंडूत आपले शतक पूर्ण केले. रोहित शर्माने केवळ वेगवान गोलंदाजांविरुद्धच नव्हे तर फिरकीपटूंविरुद्धही चांगली फलंदाजी केली. यानंतर इंग्लंड संघाची सुरुवातही चांगली झाली, पण त्याचा फायदा मधल्या फळीतील फलंदाजांना उठवता आला नाही. त्यामुळे इंग्लंडचा संघ पहिल्या डावात ५७.४ षटकांत २१८ धावांवर गारद झाला. इंग्लंडसाठी झॅक क्रॉऊलीने सर्वाधिक ७९ धावा केल्या. टीम इंडियासाठी कुलदीप यादव सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. कुलदीप यादवने १५ षटकांत ७२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. त्याचवेळी रविचंद्रन अश्विनने ४ विकेट्स घेण्यात यश मिळवले. जडेजाला १ विकेट मिळाली.पहिल्या डावात कर्णधार रोहित शर्माने जोरदार फलंदाजी केली. आपल्या संघासाठी त्याने शानदार शतक केले.

### जैस्वालने इतिहास रचला

भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटचा सामना धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यात टीम इंडियाने शानदार सुरुवात केली. भारतीय संघाने पहिल्या डावात इंग्लंडला २१८ धावांत गुंडाळले. त्याचवेळी टीम इंडियाच्या डावाची सुरुवात करताना युवा फलंदाज यशस्वी जैस्वालने इतिहास रचला आहे. त्याने असा पराक्रम केला आहे जो याआधी कोणताही भारतीय फलंदाज करू शकला नाही. त्याने याबाबती विराट कोहलीलाही मागे टाकले आहे. हा सामना सुरू होण्यापूर्वी यशस्वी जैस्वालने या मालिकेत ४ सामन्यात ६५५ धावा केल्या होत्या. अशा परिस्थितीत त्याने धरमशाला कसोटीत खाते उघडताच या मालिकेत ६५६ धावा पूर्ण केल्या. यासह तो इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनला आहे. यापूर्वी हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता. विराट कोहलीने २०१६ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत ६५५ धावा केल्या होत्या.या सामन्यात इंग्लंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

# सचिन तेंडुलकरची विल्यमसन-साऊदीसाठी खास पोस्ट

## विल्यमसन मुलांसह मैदानात; 100व्या कसोटीचे सेलिब्रेशन

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा कसोटी सामना शुक्रवारपासून क्राइस्टचर्च येथे खेळला जात आहे. हा सामना कर्णधार टीम साऊदी आणि केन विल्यमसन यांचा १००वा कसोटी सामाना आहे. सामना सुरु होण्यापूर्वी न्यूझीलंडचे दोन्ही दिग्गज खेळाडू आपल्या मुलांसह मैदानात आले आणि १०० व्या कसोटीचे अनोखे सेलिब्रेशन केले. यानंतर भारताचा महान खेळाडू सचिन तेंडुलकरने या दोन खेळाडूंना सोशल मीडियावर पोस्ट करुन शुभेच्छा दिल्या.**



भारतीय क्रिकेटचा दिग्गज सचिन तेंडुलकरने एक्सवर १००वी कसोटी खेळणाऱ्या केन विल्यमसन आणि टिम साऊदीचे कौतुक केले. सचिनने लिहिले की, "केन विल्यमसन आणि टिम साऊदी २००८ च्या अंडर-१९ विश्वचषकात त्यांच्या स्फोटक कामगिरीपासून न्यूझीलंड क्रिकेटचे प्रणेते आहेत. जवळपास १६ वर्षांनंतर ते १०० वा कसोटी सामना एकत्र खेळत आहे. कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ऐतिहासिक सामन्यासाठी त्यांना माझ्याकडून शुभेच्छा." सामन्याच्या अगदी आधी विल्यमसन आणि साऊदी त्यांच्या मुलांसोबत मैदानावर फिरताना दिसले.गुरुवारी धरमशाला येथे भारत-इंग्लंडच्या पाचव्या कसोटीत रविचंद्रन अश्विन आणि जॉनी बेअरस्टो आपला १००व्या कसोटीसाठी मैदानात उतरले होते. आता दुसऱ्या दिवशी म्हणजेच आज (८ मार्च) केन विल्यमसन आणि टिम साऊदी आपला १०० वा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरले आहेत. १००व्या कसोटीच्या निमित्ताने विल्यमसन आणि साऊदी आपल्या मुलांसोबत दिसले. दोन्ही खेळाडू मुलांसोबत मैदानात उतरले होते, ज्याचा व्हिडीओ न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने सोशल मीडियावर शेअर केला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धची दुसरी कसोटी वगळता, केन विल्यमसनने ९९ कसोटी खेळल्या आहेत.

### 2008 मध्ये कसोटी पदार्पण केले

ज्यात त्याने १७४ डावात फलंदाजी करताना ५५.२५ च्या सरासरीने ८६७५ धावा केल्या आहेत. या कालावधीत, त्याने ३२ शतके आणि ३३ अर्धशतके केली आहेत, ज्यामध्ये त्याची सर्वोच्च धावसंख्या २५१ आहे. विल्यमसनने नोव्हेंबर २०१० मध्ये अहमदाबाद येथे भारताविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यातून कसोटी पदार्पण केले होते. न्यूझीलंडच्या कसोटी संघाचा कर्णधार टिम साऊदीची ऑस्ट्रेलियाविरुद्धची दुसरी कसोटी वगळता, त्याने ९९ कसोटी सामने खेळले असून, १८८ डावांत गोलंदाजी करत २४.४९ च्या सरासरीने ३७८ विकेट्स घेतल्या आहेत. या कालावधीत त्याचा सर्वोत्तम कामगिरी १०८ धावांत १० विकेट्स राहिली आहे. साऊदीने मार्च २००८ मध्ये इंग्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यातून कसोटी पदार्पण केले होते.